International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.2 Nov – Dec 2021

# बीड जिल्हयाच्या लोकसंख्येची भिन्नता एक अभ्यास

**डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर**

**सहयोगी प्राध्यापक**

जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, नांदेड.

**गोषवारा :-**

कोणत्याही देशाची कुशल लोकसंख्या ही राष्ट्रीय संपत्ती म्हणून संबोधली जाते. मानवाच्या विकास प्रक्रियेतील लोकसंख्येची घनता व त्यांच्या घटकांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. लोकसंख्या देशाच्या किंवा प्रदेशाच्या प्रत्येक क्रियेमध्ये उदा. कृषी, कृषी आधारित उद्योग, आरोग्य, औद्योगिकरण, शिक्षण इत्यादीमध्ये महत्त्वाची ठरते. सामान्य मानसाचे दरडोई उत्पन्न वाढताना तो ज्या प्रदेशात राहतो तसेच त्या प्रदेशामध्ये त्याचे दरडोई उत्पन्न या दोन्हीही घटकांचा प्रभाव तेथील अर्थ व्यवस्थेवर पडतो. लोकसंख्येच्या माध्यमातून कुशल आणि अकुशल लोकसंख्या असे गट आर्थिक घटकांना समोर ठेवून करता येतात. कुशल श्रमिकांचे दरडोई उत्पन्न निश्चितच चांगले असलेले दिसून येते. मानवाच्या मुलभूत गरजा लक्षात घेता. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य यांची पूर्तता केली जाते. अशा कुटुंबाना उदरनिर्वाही गटामध्ये सामावीष्ट केले जाते. ज्या लोकसंख्या गटाला वरील गरजा पूर्ण करण्यासाठी अडचणी येत असतील तर त्यांना शासन स्तरावरून वेगवेगळया योजना आखून मदत पुरवली जाते. जेनेकरुन लोकसंख्येमध्ये विषमता निर्माण होणार नाही.

**बिज संज्ञा :-**

लोकसंख्या, लिंगगुणोत्तर, साक्षरता.

**प्रस्तावना :-**

प्रस्तुत अभ्यासामध्ये बीड तालुक्याच्या लोकसंख्येची अनेक भिन्नता असलेली आपणास आढळतात. बीड शहर हे जिल्हयाचे ठिकाण आसल्यामुळे निश्चितच या तालुक्याची लोकसंख्या जिल्हयातील इतर तालुक्यापेक्षा जास्त आहे. तालुक्याच्या शहरी

भागामध्ये औद्योगिकरण, शिक्षण, सेवा, आरोग्य, व्यवसाय, विविध शासकीय विभाग आणि कार्यालये यामुळे लोकसंख्येच्या केंद्रीकरणात भीन्नता असल्याचे दिसते.

**उद्देश :-**

1. बीड जिल्हयाच्या लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचे विश्लेषण करणे
2. बीड जिल्हयाच्या श्रमिकांच्या प्रकारचे अध्ययन करणे

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये द्वितीय स्त्रोतांचा वापर करून शोधननबंध लेखन करण्यात आले आहे ज्यामध्ये पुस्तके, संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध, दैनिक लेख, शासकीय अहवाल इ. चा वापर करण्यात आलेला आहे.

**बीड जिल्हयाच्या लोकसंख्येची भिन्नता 2001 ते 2011 :-**

**बीड जिल्हयाच्या लोकसंख्येची भिन्नता 2001 ते 2011**

| अ.क्र. | लोकसंख्या | 2001 | 2011 |
|---|---|---|---|
| 1 | एकूण लोकसंख्या | 21.61 लाख | 25.85 लाख |
| 2 | प्रत्यक्ष लोकसंख्या | 21,61,250 | 25,85,049 |
| 3 | पुरुष लोकसंख्या | 11,16,365 | 13,49,106 |
| 4 | स्त्री लोकसंख्या | 10,44,894 | 12,35,943 |
| 5 | लोकसंख्या वाढ | 18.61 टक्के | 19.61 टक्के |
| 6 | क्षेत्र | 10693 | 10693 |
| 7 | महाराष्ट्राच्या तुलनेत | 2.23 टक्के | 2.30 टक्के |
| 8 | लो. घनता | 202 | 242 |
| 9 | लिंगगुणोत्तर | 936 | 916 |
| 10 | बाल लिंगगुणोत्तर | 894 | 807 |
| 11 | सरासरी साक्षरता | 67.99 | 76.99 |

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | पुरुष साक्षरता | 80.70 | 85.55 |
| 13 | स्त्री साक्षरता | 54.52 | 67.82 |
| 14 | एकूण बाल लोकसंख्या (0-6) | 335283 | 352890 |
| 15 | कुशल लोकसंख्या | 1132083 | 1410027 |
| 16 | अकुशल लोकसंख्या | 1029167 | 1175022 |

बीड जिल्हयाची एकूण लोकसंख्या 2001 मध्ये 21.61 लाख इतकी होती. ती 2011 च्या जनगणनेनुसार 25.85 लाख नोंदवण्यात आली आहे. बीड जिल्हयाची प्रत्यक्ष लोकसंख्या 2001 मध्ये 21,61,250 इतकी होती, तर ती 2011 च्या जनगणनेनुसार 25,85,049 नोंदवण्यात आली. त्यामध्ये पुरुष लोकसंख्या 2001 मध्ये 11,16,365 इतकी होती, तर 2011 मध्ये 13,49,106 एवढी झाली त्याचबरोबर स्त्री लोकसंख्या 2001 मध्ये 10,44,894 इतकी होती, तर 2011 मध्ये 12,35,943 एवढी झाली. 2001 मध्ये कुशल लोकसंख्या 1132083 इतकी होती, तर 2011 मध्ये 1410027 एवढी झाली.

**निष्कर्ष :-**

एकंदरीत बीड जील्याच्या लोकसंख्येचा अभ्यास केल्यास असे आढळून येते कि, बीड जिल्हयातील लोकसंख्यावाढ ही 2001 ते 2011 दरम्यान 1.9 टक्के ऐवढी होती. लोकसंख्येची वाढ झालेली दिसते. शहरी भागा बरोबर ग्रामीण भागाची लोकसंख्याही वाढत गेलेली आहे. तर बीड जिल्हयाचे क्षेत्र एकूण क्षेत्रफळ 10693 चो.कि.मी. आहे तर ते महाराष्ट्रराज्याच्या 2.23 टक्के आहे. तर लोकसंख्येची घनता 2001 मध्ये 202 होती तर 2011 मध्ये 242 चो.कि.मी. आहे. त्याचबरोबर लिंगगुणोत्तर 2001 मध्ये 936 होते तर 2011 मध्ये 916 म्हणजेच लिंगगुणोत्तरात घट झाली आहे. साक्षरतेचा अभ्यास केल्यास असे आढळून येते की, 2001 मध्ये 67.99 होते तर 2011 मध्ये 76.99 म्हणजेच साक्षरतेत वाढ झालेली आहे तसेच कुशल लोकसंख्ये मध्ये सुध्दा वाढ झालेली आहे.

**संदर्भ सूची :-**


1. District census handbook of Beed District (2001, 2011).
2. District Social and Economic Review of Beed District (2001-2011).
3. Mote Yuvraj S. (2015) “Literacy in Nandurbar District of Maharashtra: A Geographical Analysis”, Research Front Special Issue 1, August 2016 Pp. 271-274


**डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर**

**4.** Ghos B.N. Fundamental of population geography, Sterling Publishers private limited, New Delhi.

**5.** Gosal G.S. (1982) Population Geography, vol. 4, PP.33-35.

**6.** Jana, M.M. (1996): ‘Population planning in Sikkim, Annals, Vol. XVI Nol.